**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स लोकनेते मारुतराव घुलेपाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर लिमिटेड, गट नं. ३२०, ३३४ गाव-भेंडे बुद्रुक, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ७,०००.० टन प्रतिदिन पासून ९,०००.० टनप्रतिदिन पर्यंत(विस्तार २,०००.० टन प्रतिदिन) संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर लिमिटेड, गट नं. ३२०, ३३४ गाव-भेंडे बुद्रुक, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ७,०००.० टनप्रतिदिन पासून ९,०००.० टनप्रतिदिन पर्यंतसंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीदिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ५१ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२७८१ दिनांक २३ जुलै, २०१९ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर - **अध्यक्ष**

किंवा त्यांचे प्रतिनिधी

(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा

कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक

(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **समन्वयक**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,

अहमदनगर

श्री अजित वसंतराव पाटील, उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, अहमदनगर तथासमन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री पाटील यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, अहमदनगर यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर लिमिटेड, गट नं. ३२०, ३३४

गाव-भेंडे बुद्रुक, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ७,०००.० टनप्रतिदिन पासून ९,०००.० टनप्रतिदिन पर्यंतसंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीआयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग अ ५ (जे)मध्ये मोडत असल्याने त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या वने,पर्यावरण व हवामान बदल विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी त्यास मान्यता देण्यात आली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, अहमदनगर यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ०८ जुलै, २०१९ रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघातमुल्यांकन अहवालाची व कार्यकारी वृतान्ताची एक प्रत (इंग्रजी व मराठी) मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय,

अहमदनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, तालुका व जिल्हा - अहमदनगर, जिल्हा उद्योग केंद्र, तालुका व जिल्हा - अहमदनगर, उप विभागीय अधिकारी, तालुका व जिल्हा - अहमदनगर,तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगर, ग्रामपंचायत कार्यालय, भेंडे बुद्रुक, भेंडे खुर्द, कुकाणा, सौंदाळा, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगर, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व मप्रनि मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.समन्वयक यांनी असे सांगितले की स्थानिक मप्रनि मंडळ अहमदनगर कार्यालयास उपरोक्त प्रकल्प विस्तारिकरणाबाबत एकही लेखी आक्षेप प्राप्त झालेलानाही. समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. त्यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली. मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना संबंधित प्रकल्प विस्तारिकरणाच्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत सादरीकरण उपस्थितांना देण्याची सूचना केली.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. त्यावेळी त्यांनी सांगितले की सदरहू साखर गाळप विस्तारिकरण कार्यरत प्रकल्पस्थळातच करण्यात येणार आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या वने,पर्यावरण व हवामान बदल विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक ३०-०१-२०१८ रोजी त्यास मान्यता देण्यात आली.

सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग अ ५ (जे)मध्ये मोडत असल्याने त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्प प्रवर्तकांनी तयार केलेली पर्यावरण व्यवस्थापन योजना, कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधीची तरतुद याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधी हा १५ लाख आरक्षित करण्यात आलेला आहे. त्यात वृक्षारोपण, जलपुनर्भरण, सेंद्रिय खत योजना इत्यादी कामे करण्यात येतील. त्यांनी सांगितले की प्रकल्पात पाण्याचा वापर कमी होण्यासाठी पाणी वापराचे अंकेक्षण (ऑडीट) वेळोवेळी करण्यात येईल.

श्री प्रशांत पाटील, अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की सदरहू प्रकल्प कार्यरत असून प्रकल्पातील साखर गाळप क्षमतेचे विस्तारिकरण करण्याचे प्रकल्प प्रवर्तकांनी योजिले आहे. त्यामुळे पर्यावरणावर काही परिणाम होतो का व त्याबाबत आपल्या काही शंका, सुचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. आताच पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण केलेले असून आपल्या सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदवू शकतात. आपले मत, सूचना, आक्षेप नोंदविताना नाव व गावाचे नाव सांगण्यात यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे प्रकल्पाबाबत काही पर्यावरणीय शंका, आक्षेप, असल्यास त्या उपस्थित करण्याची सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्नव त्यास प्रकल्प प्रवर्तक /प्रकल्प सल्लागार/पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१)श्री गणेश कारभारी गव्हाणे, माजी सरपंच, भेंडा बुद्रुक, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः-**

प्रकल्पाचे विस्तारिकरण झाल्यावर प्रकल्पात किती सांडपाणी उत्पन्न होईल व त्यावर कोणती प्रक्रिया करण्यात येईल. पूर्वी घराजवळ सांडपाणी येऊन त्रास होत होता. मात्र कारखान्याने त्याची पर्यायी व्यवस्था केलेली आहे. ते सांडपाणी कारखान्याच्या शेतात सोडले जाते. आता त्रास होत नाही.

सदरहू प्रकल्पामुळे बेरोजगारांना रोजगार मिळालेला आहे. प्रकल्प परिसरात कारखान्याच्या माध्यमातून ६,००० कुटुंबांचा एक संघ तयार झालेला आहेत.

**२) डॉ. रावसाहेब एकनाथ फुलारी, राहणार-भेंडा बुद्रुक, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः-**

प्रकल्पाविरुध्द कितीही विरोध केला तरी प्रकल्पास परवानगी मिळणार आहे. प्रकल्पाबाबत तक्रारी केल्या, तरी त्याची दखल प्रकल्प प्रवर्तकांकडून घेण्यात येतनाही. प्रकल्प नियोजनबध्द कार्यरत आहे. मात्र केलेल्या तोंडी वा लेखी तक्रारीची नोंद घेण्यात येत नाही. प्रकल्पाच्या शेजारीच राहण्यास असून प्रकल्प उत्पादनातून उत्पन्न होणारी सुमारे एक पोतेभर काजळी झाडत असतो. त्याबाबत सुधारणा व्हावी. प्रकल्प चांगला चालावा, मात्र तक्रारीची नोंद घेण्यात यावी.

३) **श्री बबनराव तागड, राहणार-भेंडा बुद्रुक, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः**

प्रकल्प विस्तारिकरणाबरोबर हरित पट्टा विकसित करणार आहेत तर त्यासाठी किती झाडे लावणार, किती एकर जमिनीवर झाडे लावणार व कोणती झाडे लावणार?

४) **श्री राजेन्द्र रामराव आढाव, राहणार-बाहेगाव,तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः**

सदरहू प्रकल्पाच्या विस्तारिकरणासाठी किती खर्च येणार येईल?

५) **श्री शरद बाबुराव अरगडे, राहणार-सौंदाळा,तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः-**

विस्तारिकरणानंतर प्रकल्पात नविन बॉयलर व त्यास चिमणी बसविणार आहेत काय?

६) **श्री बाळासाहेब एकनाथ अरगडे, राहणार- सौंदाळा, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः-**

प्रकल्प विस्तारिकरणामुळे वाढीव पाणी किती लागणार आहे.

७) **श्री एच. मधुबाबु, पर्यावरण कार्यकर्ता, हैद्राबादः-**

प्रकल्पास पाठिंबा व्यक्त करताना काही सूचना आहेत, त्या लेखी स्वरुवात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस सादर करत आहे.

८) **श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैद्राबादः-** प्रकल्पास पाठिंबा देताना काही सूचना करत आहे. त्या इंग्रजी भाषेत सांगण्याची परवानगी देण्यात यावी. मी भारतातील सर्वात प्रथम पर्यावरणवादी आहे की जो प्रकल्पास पाठिंबा देत असतो. ब-याचवेळा भारतातील पर्यावरणवादी प्रकल्पास विरोध करतात. मात्र मी सदरहू विस्तारिकरण प्रकल्पास पाठिंबा देत आहे. भारतात १८ ते ३५ वर्षांचे ४० कोटी तरुण बेकार आहेत, त्यांना रोजगाराची आवश्यकता आहे. भारतात केंद्र सरकार व विविध राज्ये त्या सर्वांना रोजगार देऊ शकत नाही. शासन अंदाजे फक्त पाच लाख लोकांना रोजगार देऊ शकते. मात्र विविध उद्योगात त्यांना रोजगार मिळू शकतो. त्यासाठी विविध प्रकल्पांची गरज आहे. प्रकल्प सल्लागारांनी परिसरातील जल, हवा, माती, ध्वनी या सर्व घटकांचे सर्वेषण केलेले आहेत. तरीपरिसरातील जनतेचे आरोग्य सर्वेषण घ्यावे. त्याचप्रमाणे

प्रकल्पास पाण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी पावसाच्या पाण्याची साठवण करण्यासाठी पाण्याची टाकी बांधण्यात यावी. स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात यावी. त्याचप्रमाणे स्थानिक युवक युवतींना कौशल्यविकास योजना आखणी करुन नोकरी करण्यासाठी सक्षम करण्यात यावे. प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिक जनतेच्या गरजा जाणून घेण्यासाठी एक समन्वयक समितीची स्थापना करावी त्यातस्थानिक प्रतिनिधी, स्थानिक मप्रनि मंडळ अधिकारी यांचा समावेश व्हावा. स्थानिक शेतक-यांना ठिंबक सिंचन योजना अवलंबिण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे. प्रकल्पास शुभेच्छा देताना प्रकल्प प्रवर्तकांनी विविध योजनेव्दारे पर्यावरण संवर्धन करावे. प्रकल्प सल्लागार यांनी योग्यप्रकारे सर्वेषण केल्याबद्दल त्यांचे आभार व पर्यावरणविषयक जनसुनावणी समितीस विनंती आहे की त्यांनी सदरहू प्रकल्पास मंजूरी प्रदान करण्यासाठी शासनास शिफारस करावी.

९) **श्री दादासाहेब हौशीराम गजरे, राहणार-भेंडा बुद्रुक,तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः**

प्रकल्पाच्या जवळच राहतो. आमचे धुळ, काजळी व पाण्याचे प्रदूषण असे तीन प्रश्न होते. आता प्रकल्प प्रवर्तक सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते त्यांच्या शेतात वापरतात. त्याचप्रमाणे तीन नविन चिमणी (स्टॅक) कार्यान्वित केल्यामुळे आता काजळीचा त्रास होत नाही. त्याचप्रमाणे कारखान्याने परिसरात वृक्षारोपण केलेले असल्याने आता धुळीचा त्रास होत नाही.

१०) **श्री वाय चंद्रसेखर रेड्डी, सामाजिक कार्यकर्ता, पर्यावरणवादी, हैद्राबादः-**

प्रकल्पातील उत्पादन विस्तारिकरणाबरोबर सांडपाणी नियंत्रण सयंत्रणेची क्षमता वाढविण्यात यावी. प्रदूषण नियंत्रण करण्यात यावे. परिसरातील

गावे प्रकल्प प्रवर्तकांनी दत्तक घ्यावीत. तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी ठिबक सिंचन योजनेसाठी मदत व प्रोत्साहन करावे. परिसरात कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधीतून पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण (रेन वॉटर हारवेस्टींग) करण्यात यावे. कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी राखीव ठेवल्यावर विविध योजना हाती घेण्यात याव्यात. प्रकल्पास पर्यावरण अनुमती देण्याची शिफारस पर्यावरणविषयक जनसुनावणी समितीने करावी अशी त्यांनी मागणी केली.

११) **श्री सोमनाथ हरी गव्हाणे, राहणार-भेंडा बुद्रुक, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः-**

प्रकल्पाच्या सीमाभिंतीपासून १० फुटावरच आमचे सर्व कुटुंब राहतात. पूर्वी प्रकल्पातील सांडपाण्यामुळे परिसरात त्रास होत असे. मात्र प्रकल्प प्रवर्तकांनी कार्यान्वित केलेल्या सांडपाणी नियंत्रण सयंत्रणेमुळे सांडपाण्याचा त्रास नाही. प्रक्रिया केलेले सांडपाणी कारखाना त्यांच्या शेतीसाठीच वापरतात. त्याचप्रमाणे वृक्ष लागवडीमुळे धुळीचा त्रास होत नाही. प्रकल्पमुळे स्थानिकांना कोणताची त्रास होत नाही.

१२) **श्री बाळकृष्ण माधव वाघळकर, राहणार-भेंडा बुद्रुक, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः-**

प्रस्तावित विस्तारिकरणासाठी किती जागा लागेल. त्याचप्रमाणे उपस्थितांसमोर पर्यावरण अहवाल वाचला, त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

१३) **श्री संदीप बलभीम गव्हाणे, राहणार-भेंडा बुद्रुक, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः-**

मागच्या वर्षी प्रकल्पाबाबत तक्रार केलेली होती. त्याचा तक्रार निवारण अहवाल अद्यापपावेतो प्राप्त झालेला नाही. त्यांनी पुढे विचारणा केली की ग्रामपंचायतीच्या पूर्व परवानगीशिवाय प्रकल्प हा

कार्यान्वित राहू शकतो काय?त्यांनी माहिती अधिकार, २००५ अन्वये प्राप्त करण्यात आलेली माहिती सादर केली. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी यावेळी मत मांडले की सदरहू सुनावणी ही प्रकल्पाच्या विस्तारिकरणाच्या पर्यावरणविषयक बाबींबद्दल आहे. इतर विषयांबाबत वेगळे व्यासपीठ असते. तरी फक्त पर्यावरणविषयक मुद्द्यांबाबत चर्चा करण्यात यावी.

१४) **श्री बोधक चंद्रकांत वामनराव, माजी अभियंता, सार्वजनिक बांधकाम खाते, राहणार-भेंडा बुद्रुक, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः**-यापूर्वी श्री गणेश गावणे यांनी प्रकल्पातील सांडपाण्याबाबत केलेल्या सूचनेनुसार प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पाबाहेर सांडपाणी सोडण्याऐवजी प्रकल्पात साठवण करण्यात यावी. प्रकल्पाबाहेर सोडण्यात येऊ नये.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनीउपस्थितांना त्यांचे काही प्रश्न असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी चर्चेत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना मुद्दे, याबाबत प्रकल्प प्रवर्तक व पर्यावरण सल्लागार यांनी एकत्रित उत्तरे देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांचे कार्यकारी संचालक यांनी उत्तर देताना सांगितले की श्री गणेश गव्हाणे यांनी विचारल्याप्रमाणे विस्तारिकरामुळे सुमारे १०-१५ घनमीटरप्रतिदिन वाढ होऊ शकते. सदरहू सांडपाण्यावर प्रकिया करून त्याचा उत्पादनप्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे. त्यांनी डॉ. फुलारी यांच्या प्रश्नास उत्तर देताना सांगितले की हवा प्रदूषण नियंत्रणासाठी इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर ही आधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. ती ९९.९९% क्षमता दाखविते. त्यामुळे परिसरात काजळीचा त्रास होणार नाही.

प्रकल्प प्रवर्तकांचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की प्रकल्पात ३८,००० झाडे लावलेली असून यावर्षी सुमारे २,००० झाडे लावण्यात येतील, त्यापैकी ७०० झाडे लावण्यात आलेली आहेत. विस्तारिकरणासाठी सुमारे १५ कोटी एवढा खर्च प्रस्तावित आहे. विस्तारवाढीसाठी कुठल्याही प्रकारचा बॉयलर व चिमणी घेण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे विस्तारिकरणामुळे १०-२० घनमीटर प्रतिदिन अतिरिक्त पाण्याची गरज भासेल. मात्र कारखान्यात उत्पन्न होणारे सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येईल. त्यांनी उपस्थितांनी प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा दिल्याबद्दल आभार व्यक्त केले.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की विस्तारिकरणासाठी प्रकल्पास अतिरिक्त सुमारे २००.० घनमीटर प्रतिदिन पाण्याची गरज भासेल. प्रकल्पात सांडपाणी सनियंत्रण प्रक्रिया सयंत्रणेची क्षमता १,५००.० घनमीटर प्रतिदिन कार्यरत आहे. उत्पन्न होणारे सांडपाणी प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येईल.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगतीले की प्रकल्पात ८० टीपीएच क्षमतेच्या बॉयलरसाठी ७६ मिटर्सची चिमणी व ११० टीपीएच क्षमतेच्या बॉयलरसाठी ८५ मीटर्स उंचीची चिमणी आधुनिक सयंत्रणा इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटरसहित कार्यान्वित आहेत. त्याचप्रमाणे ४० टीपीएच बॉयलरला ८० मीटर्सती चिमणी व वेटस्क्रबर लावण्यात येऊन तो राखीव म्हणून ठेवण्यात आलेला आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की स्थानिकाना बैठकीत उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची व त्यास प्रकल्प प्रवर्तक व पर्यावरण सल्लागार यांना दिलेली स्पष्टीकरण याची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा समावेश इतिवृतान्तात करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त बैठकीत प्रकल्प विस्तारीकरणास पाठिंबा असलेली व विस्तारिकरणास आक्षेप नोंदविलेली सर्व निवेदने/पत्रे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत

केंद्र सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. याबाबत पुढील निर्णय हा तज्ज्ञ समिती घेईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

बैठकीत प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा देणारी व आक्षेप नोंदविणारी निवेदने/पत्रे सोबत जोडली आहेत.

| | |
|---|---|
| **(अजित पाटील)** | ( ) |
| समन्वयक, | प्रतिनिधी, सदस्य, |
| पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती | पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती |
| तथा | प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, |
| उप प्रादेशिक अधिकारी,मप्रनि मंडळ, अहमदनगर | नाशिक |

**(प्रशांत पाटील),**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर
जिल्हा- अहमदनगर